महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

संचालनालय,लेखा व कोषागारे,

कस्तुरी इमारत, जे. टाटा मार्ग, पेट्रोलियम हाऊस समोर, चर्चगेट, मुंबई-४०० ०२०.

दूरध्वनी क्र. ०२२-२२६२६२९१ Email Id - ad.admin@mahakosh.in संकेतस्थळ:-www.mahakosh.gov.in

---

संदर्भ :- १. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेतन ११९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३,दि.२०.०७.२००१

२. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेतन-२००२/प्र.क्र.१/सेवा-३, दि.११.०१.२००२

३. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेतन ११०९/प्र.क्र.४४/९९/सेवा-३, दि.०१.०४.२०१०

४. शासन शुद्धीपत्रक वित्त विभाग क्र.आप्रयो-१०१५/प्र.क्र.१११/२०१५/सेवा-३, दि.२३.१२.२०१५

५. शासन निर्णय, वित्त विभाग क्र. वेतन-१९९९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३, दि.०२.०३.२०१९

६.संचालनालयाचे आदेश क्र.संलेको २०२३/प्रशा-राप/सुसेआप्रयो/ले.अ./१६९५, दि.१२.१२.२०२३

---

क्र.संलेको २०२५/प्रशा-राप/सुसेआप्रयो/सहा.संचा./ 1176 दिनांक :- 24 NOV 2025

## -: आदेश :-

**विषय**:- तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेनुसार देण्यात आलेला लाभ रद्द करणेबाबत.
श्री.प्रभाकर विठ्ठलराव डाके, सहायक संचालक

उपरोक्त संदर्भीय संचालनालयाचे दि.१२.१२.२०२३ रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा लेखा अधिकारी संवर्गातील श्री.प्रभाकर विठ्ठलराव डाके, सहायक संचालक (आदेशातील भाग-२ अ.क्र.३४) यांना लेखा अधिकारी संवर्गात २० वर्षे नियमित सेवा झालेली असल्यामुळे तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेनुसार उपसंचालक संवर्गाचा दुसरा लाभ अनुज्ञेय करण्यात आला आहे.

सहायक संचालक संवर्गातून उपसंचालक संवर्गात सेवाज्येष्ठतेनुसार तात्पूरत्या स्वरुपात पदोन्नती देणेसाठी पात्र असलेल्या अधिका-यांच्या सन २०२३-२४ च्या निवडसूचीस सामान्य प्रशासन विभागाने मान्यता दिली. सदरच्या अनुषंगाने संचालनालयाचे परिपत्रक दि.०९.०९.२०२४ अन्वये पदोन्नती पसंतीक्रम मागविण्यात आले. सदर निवडसूचीत श्री.डाके यांच्या नावाचा समावेश होता. तथापि श्री.डाके यांनी दि.१२.०९.२०२४ रोजीच्या अर्जान्वये पदोन्नतीस इच्छुक नसलेबाबत संचालनालयास कळविले. तद्नुषंगाने दि.०३.१०.२०२४ रोजीच्या पदोन्नती आदेशामधून श्री.डाके यांचे नाव वगळण्यात आले.

शासन शुद्धीपत्रक, वित्त विभाग दि.२३.१२.२०१५ व शासन निर्णय, वित्त विभाग दि.०२.०३.२०१९ मधील मधील (xx) (३) मध्ये "**सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेखाली पहिला / दुसरा व तिसरा अथवा तिन्ही लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या अधिकाऱ्यांना देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील, मात्र दिलेल्या लाभांची वसूली करण्यात येणार**

**नाही. तसेच असे लाभ काढून घेतल्यानंतर संबंधिताची वेतननिश्चिती ही त्यांना जणू काही या योजनेचे लाभ देण्यात आले नव्हते असे समजून, महाराष्ट्र नागरी सेवा(वेतन) नियम, १९८१ मधील नियम १२ च्या तरतुदीनुसार करण्यात येईल.**" असे नमुद आहे.

उपरोक्त पार्श्वभूमीवर शासन शुद्धीपत्रक, वित्त विभाग दि.२३.१२.२०१५ मधील नमूद तरतुदीनुसार श्री.डाके यांना संचालनालयाचे आदेश दि.१२.१२.२०२३ अन्वये तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत देण्यात आलेला दुसरा लाभ (उपसंचालक संवर्ग) त्यांनी पदोन्नती नाकारल्याचा दि.१२.०९.२०२४ पासून काढून घेण्यात येत आहे.

(दीपा देशपांडे)
संचालक, लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :- १. सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, छत्रपती संभाजी नगर-४३१००३ यांना - श्री.डाके यांना सदर लाभ काढून घेतल्याच्या दिनांकानंतरही प्रत्यक्ष लाभ प्रदान केले असल्यास ते वसूल करुन तसा अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.

२. श्री.प्रभाकर विठ्ठलराव डाके, सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, हिंगोली